# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर- ४१६ ००४.

क्र.कोविमं/उच्च माध्य./गोप. /२१९१
दिनांक :- २३/१०/२०१९

परीक्षा प्राधान्य/महत्वाचे

प्रति,

प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा / सांगली / कोल्हापूर.

**विषयः- फेब्रु.-मार्च २०२० च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यासाठी शिक्षक माहिती पाठविणेबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणापत्र परीक्षेची प्रात्यक्षिक परीक्षेसाठी मंडळाकडून ज्या विषयांकरिता अंतर्गत व बहिस्थ परीक्षक म्हणून नियुक्ती केली जाते अशा विषयांच्या शिक्षकांची माहिती मंडळाकडे उपलब्ध आहे ती माहिती विषयनिहाय पडताळणीसाठी या पत्रासोबत आपणाकडे पाठविण्यात येत आहे त्याची खालील मुद्देनिहाय पडताळणी व सुधारणा करुन अद्यावत माहिती परत मंडळाकडे पाठविण्यात यावी.

१) यादीमधील विषय निहाय शिक्षक त्याच विषयाला शिकवत आहेत काय? कनिष्ठ महाविद्यालयात प्रात्यक्षिक परीक्षा असलेल्या विषयांना शिकवत असलेल्या सर्व शिक्षकांची नांवे आहेत काय? नसल्यास शिकवत असलेल्या विषयनिहाय सर्व शिक्षकांची त्या विषयामध्ये नांवे समाविष्ठ करण्यात यावी म्हणजे त्या शिक्षकांच्या प्रमाणात प्रात्यक्षिक परीक्षेसाठी आपल्या कनिष्ठ महाविद्यालयास बहिस्थ परीक्षकांची नियुक्ती केली जाईल. बहिस्थ व अंतर्गत परीक्षक कमी पडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कनिष्ठ महाविद्यालयाची राहिल.

२)सर्व विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षेसाठी शिक्षकाचे नाव येणे आवश्यक आहे शिक्षक माहिती नसल्यास शिक्षकाचे नाव समाविष्ठ करावे कोणत्याही परिस्थितीत रकाना रिकामा सोडण्यात येवू नये. म्हणजे त्यानुसार सदर विषयास अंतर्गत/बहिस्थ परीक्षक नियुक्ती करणे मंडळास सुलभ होईल.

३)शिक्षक माहिती पडताळणी करत असताना संबंधित विषय शिक्षकांना दाखवून त्यांची स्वाक्षरी घ्यावी. तसेच आवश्यकतेनुसार संबंधित विषय शिक्षकांना मंडळाचे परीक्षक/नियामक म्हणून काम करावे लागेल व परीक्षक/नियामक पॅनलमध्ये त्यांचे नाव समाविष्ठ करण्यात येईल (एम.सी.व्ही.सी. विषय सोडून) याचीही कल्पना देण्यात यावी. त्यामुळे मंडळमार्फत परीक्षक/नियामक म्हणून नियुक्त केल्यास ती स्वीकारणे बंधनकारक राहील.

४)एम.सी.व्ही.सी. विषयाची शिक्षक माहिती पडताळणी करत असताना या विषयासाठी निदेशकाचेच नाव असल्याची खात्री करावी. निदेशकाव्यतिरिक्त विषय शिकविणाऱ्या शिक्षकाचे नाव आल्यास निदेशकाचे नाव देवून दुरुस्ती करावी जेणे करुन भविष्यात कोणाची तक्रार येणार नाही.

वरीलप्रमाणे माहितीची पडताळणी करून जास्तीत जास्त शिक्षकांची माहिती १५ नोव्हेबर २०१९ पर्यंत पाठविण्यात यावी म्हणजे मंडळास अंतर्गत/बहिस्थ परीक्षकांची नियुक्ती करणे सुलभ होईल. अंतर्गत/बहिस्थ परीक्षकांच्या नियुक्ती अभावी परीक्षा घेण्यास अडचंणी निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाची राहील याची नोंद घ्यावी.

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर.

सोबतः- आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील प्रात्यक्षिक परीक्षेसाठी प्राप्त शिक्षकांची संगणक माहिती.